महाराष्ट्र विधानसभा

दिवसाच्या कामकाजाचा क्रम
मंगळवार, दिनांक १३ मार्च, २०१८

(सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :

(शुक्रवार, दिनांक ९ मार्च, २०१८ रोजी दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १)

(१) **श्री. अमित साटम, श्रीमती मनिषा चौधरी, सर्वश्री. विजय वडेट्टीवार, राधाकृष्ण विखे-पाटील, सुनिल केदार, अमर काळे, अस्लम शेख, हर्षवर्धन सपकाळ, ॲड.यशोमती ठाकूर, श्री. डी.पी. सावंत, डॉ. संतोष टारफे, ॲड. राहुल कुल, श्री.अतुल भातखळकर वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे अन्न व औषध प्रशासन मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"राज्यात भेसळयुक्त दूधाची विक्री होत असल्याप्रकरणी विशेष तपासणी मोहिम राबविण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास येणे, शासकीय, खाजगी दूध डेअऱ्यांसह चिलिंग युनिटमधून दूधाचे ७४२ नमूने तपासणीसाठी पाठविण्यात येणे, पुणे विभागातून २६७ नमूने घेण्यात येणे, भेसळ व अस्वच्छतेच्या कारणावरुन २६ हजार ५२० रुपयांचा दूधाचा साठा नष्ट करण्यात येणे, मुंबई शहरात वाटप होणाऱ्या दूधात ३० टक्के भेसळ होत असणे, दूध भेसळ तपासणी करण्याकरीता मोबाईल व्हॅन तसेच कर्मचारी व अधिकारी वर्ग अपुरा असणे, भेसळीच्या प्रवृत्तीला लगाम घालण्यासाठी प्रचलित कायद्याला मर्यादा असणे, कोटयवधी लोकांच्या जीवनाशी संबंधित दूध, खवा, औषधे आणि हॉटेल खाद्यपदार्थावरील भेसळ रोखण्यासाठी कायद्यात बदल करण्याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(२) **सर्वश्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, चंद्रदीप नरके, अनिल बाबर वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उर्जा मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"कोल्हापूर विद्युत परिमंडळ अंतर्गत माहे मार्च, २०१४ पासून कोल्हापूर जिल्ह्यात ८०५८ तसेच सांगली जिल्ह्यात १२,५६९ शेतीपंप वीज जोडणी प्रलंबित असणे, कोल्हापूर जिल्ह्यातील पायाभूत सुविधा क्र.२ या योजनेंतर्गत शेतीपंपास वीज जोडणी देण्यास मंजुरी

देऊन व शेतकऱ्यांनी पैसे भरुनसुद्धा पायाभूत आराखडा मंजूर नसल्याने व त्यासाठी निधी उपलब्ध करून न दिल्याने वीज जोडणी प्रलंबित असणे, ३०३४ वीज मीटरची मागणी असतांना तुटवडा असल्याने अनेक वीज मीटर जोडण्या प्रलंबित असणे, शेतकऱ्यांनी शेतामध्ये बोअर, विहीर व पाईप लाईन टाकणे, मोटार खरेदी करणे ई.कामे केली असून केवळ शेतीपंपासाठी वीज जोडणी अभावी अनेक कामे प्रलंबित असल्यामुळे शेतकऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, मुख्य अभियंता यांनी माहे ऑक्टोबर, २०१६ व फेब्रुवारी, २०१७ मध्ये शेतीपंप वीज जोडणीसाठी कोल्हापूर जिल्ह्यास सुमारे ८७ कोटी तसेच सांगली जिल्ह्यास सुमारे १५५ कोटी इतक्या निधीची केलेली मागणी, कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात शेतीपंप वीज जोडणी देणे व त्यासाठी आवश्यक निधी तत्काळ उपलब्ध करून देणेबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री. अमित देशमुख, राधाकृष्ण विखे-पाटील, बाळासाहेब थोरात, प्रा. वर्षा गायकवाड, ॲड. यशोमती ठाकूर, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री. मो. आरिफ नसीम खान, अमिन पटेल, अस्लम शेख, कुणाल पाटील, विजय वडेट्टीवार, डॉ. संतोष टारफे, सर्वश्री. त्र्यंबक भिसे, अतुल भातखळकर, विलासराव जगताप, सुनिल केदार, अमर काळे, हर्षवर्धन सपकाळ, डी. पी. सावंत, पृथ्वीराज चव्हाण, कालीदास कोळंबकर, श्रीमती अमिता चव्हाण, सर्वश्री. जयकुमार गोरे, गणपत गायकवाड, अबु आझमी, वि.स.स. तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक आरोग्य मंत्र्याचे लक्ष वेधतील :-**

"नागपूर जिल्ह्यामध्ये कुष्ठरुग्ण सर्वाधिक असूनही येथील कुष्ठरुग्णांना गत दोन वर्षांपासून आवश्यक औषधांसह व्यायामाचे साहित्य तसेच गत एक वर्षापासून आरोग्य विभागास जनजागृतीचे साहित्य उपलब्ध झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ च्या सुमारास निदर्शनास येणे, केंद्र शासनाकडून कुष्ठरोगावर नियंत्रणासाठी राज्यास प्रत्येक वर्षी सुमारे ६० लाख रुपयांचा निधी प्राप्त होत असतांना नागपूर जिल्ह्यास केवळ २.१५ लाख रुपयांचा निधी प्राप्त झाल्यामुळे जिल्हा कुष्ठरोग निर्मूलन सोसायटीकडून साहित्यांची खरेदी केलेली नसणे, त्यामुळे सन २०१६-१७ चा निधी परत गेला असून सन २०१७-१८ या वर्षाचाही निधी परत जाण्याची निर्माण झालेली शक्यता, नागपूर वगळता राज्यातील अन्य जिल्ह्यांमध्ये साहित्याची खरेदी केली जात असतांना, नागपूर जिल्ह्यातील संबंधित अधिकाऱ्यांमधील समन्वयाअभावी ४०० ते ५०० कुष्ठरुग्णांना त्रास सहन करावा लागत असल्यामुळे त्यांच्यामध्ये पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रीया."

(सकाळी ११.०० वाजता)

एक : प्रश्नोत्तरे -

(अ) तारांकित प्रश्न

(ब) सोमवार, दिनांक १२ मार्च, २०१८ रोजीची तारांकित प्रश्नोत्तरांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -

(१) मुख्यमंत्री : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **गृह विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(२) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री : विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(३) कृषि व फलोत्पादन मंत्री : (क) विदर्भ, मराठवाडा आणि उर्वरित महाराष्ट्र यासाठी विकासमंडळे आदेश, २०११ मधील नियम ८ अन्वये **कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचा** सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील योजनांतर्गत आणि योजनेत्तर योजनांवरील वैधानिक विकास मंडळनिहाय (अविभाज्य भागासह) प्रत्यक्ष खर्चाचा तपशील सभागृहासमोर ठेवतील.

(ख) महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

(४) **ऊर्जा मंत्री** : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित यांचा सन २०१६-२०१७ या वर्षाचा बारावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

तीन : स्थगन प्रस्तावाच्या सूचना — (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).

चार : वित्त मंत्री यांचा म.वि.स. नियम ५७ अन्वये प्रस्ताव :

"अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधानसभा नियमांतील नियम २४६(१) मधील सात दिवसांच्या कालावधीबाबतची जी तरतूद आहे ती महाराष्ट्र विधानसभा नियमांतील नियम ५७ अन्वये स्थगित करण्यात यावी.

पाच : सन २०१८-२०१९ च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा (पहिला दिवस).

सहा : शासकीय विधेयके :

(१) पुर:स्थापनार्थ :-

(अ) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ८ — महाराष्ट्र भूमिगत नळमार्ग व भूमिगत वाहिन्या (जमिनीमधील वापर हक्काचे संपादन) विधेयक, २०१८.

(ब) सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ — महाराष्ट्र परिचारिका (सुधारणा) विधेयक, २०१८.

(२) विचार पुढे सुरु, खंडश: विचार व संमत करणे :-

सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ४ — हैदराबाद अतियात चौकशी (सुधारणा) विधेयक, २०१८.

(३) विचार, खंडश: विचार व संमत करणे :-

(क) **सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ — भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क**

(महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८.

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अस्लम शेख, अमर काळे, सुनिल केदार, अमिन पटेल, डॉ.संतोष टारफे, श्रीमती निर्मला गावीत, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.राधाकृष्ण विखे-पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री हर्षवर्धन सपकाळ, अमित झनक, प्रा.विरेंद्र जगताप, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१८ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७ – भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१८ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(गुरुवार, दिनांक ८ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

सात : श्री.सुनिल प्रभु, ॲड.आशिष शेलार, सर्वश्री अजय चौधरी, संजय केळकर, सुनिल शिंदे, ॲड राज पुरोहित, श्री सदा सरवणकर, ॲड.पराग अळवणी, सर्वश्री अशोक

पाटील, अमित साटम, मंगेश कुडाळकर, श्रीमती मनिषा चौधरी, श्री.सुनिल राऊत, श्रीमती मंदा म्हात्रे, सर्वश्री प्रकाश फातर्पेकर, अतुल भातखळकर, श्रीमती तृप्ती सावंत, सर्वश्री योगेश सागर, संजय पोतनीस, सरदार तारासिंह, रमेश लटके, कॅ.आर.तामिल सेल्वन, श्री.प्रकाश सुर्वे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री तुकाराम काते, राम कदम, नरेंद्र मेहता, मंगलप्रभात लोढा, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)

"मुंबई शहर व उपनगरांचा सन २०१४ ते २०३४ या २० वर्षाचा शासनाकडे प्रलंबित असलेला विकास आराखडा, विकास आराखडयास मंजूरी न दिल्यामुळे ठप्प झालेली विकास कामे, विकास आराखडयास त्वरित मान्यता देण्याची आवश्यकता, गृहनिर्माण धोरणास मान्यता देण्यास होत असलेला विलंब, ५०० चौ. फुटापर्यंतच्या मुंबईतील घरांना मालमत्ता करामध्ये सवलत देण्याबाबतच्या निर्णयास शासनाने त्वरित मान्यता देण्याची आवश्यकता, मुंबईतील शिवडी, गोराई (बोरिवली), माहिम भागातील जैवविविधतेमुळे पानथळीने व्यापलेले क्षेत्र पर्यटन क्षेत्र म्हणून जाहीर करण्याच्या जिल्हयाधिकाऱ्यांना दिलेल्या सूचना, तथापि, जिल्हाधिकाऱ्यांनी कोणतीच कार्यवाही न केल्यामुळे पानथळ क्षेत्रांवर दिवसेंदिवस वाढत जाणारी अनधिकृत बांधकामे, मुंबई शहर व उपनगरातील विकासक, मोठमोठया कंपन्या, मॉल्स यांनी महापालिकेचा सुमारे १३३.२५ कोटी रुपयांचा थकवलेला कर, विविध शासकीय कार्यालयांनी ३२० कोटी रुपयांपेक्षा अधिक रक्कमेची थकविलेली पाणी देयके, म्हाडा वसाहतीमधील सदनिकांचे रुपये १५५ वरुन रु. १०२७ पर्यंत माहे एप्रिल, १९९८ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वाढविण्यात आलेले सेवाशुल्क, म्हाडाच्या ५६ वसाहतींचा रखडलेला पुनर्विकास व या वसाहतीमधील ५० वर्षापूर्वीच्या मल:निसारण वाहिन्या दुरुस्त न केल्यामुळे पाणी तुंबून त्या ठिकाणी रोगराई पसरण्याचा निर्माण झालेला धोका, मुंबईतील मोडकळीस आलेल्या उपकर प्राप्त व बिगर उपकरप्राप्त सुमारे १४ हजार इमारती, पंतप्रधान आवास योजना, इमारत व पुनर्रचना मंडळाच्या व झोपडपट्टी पुनर्विकास योजनेतंर्गत बांधलेल्या इमारतीची दुरुस्ती, बीपीटी व बीआयटीच्या जागेवरील धोकादायक इमारती, म्हाडाच्या इमारतींमध्ये ३०० पेक्षा जादा घुसखोर असल्याचे निष्पन्न होणे, मुंबईतील सात रस्ता (आर्थर रोड) येथील मध्यवर्ती कारागृहाच्या सुरक्षिततेसाठी कारागृहापासून ५०० मीटर परिसरातील इमारतींचा व झोपडपट्टयांचा १० वर्षापासून खुंटलेला पुनर्विकास, वरळी येथील प्रेमनगर, व्ही. पी नगर, सिध्दार्थ नगर, जिजामाता नगर, मरिअम्मानगर इत्यादींचा गेल्या अनेक वर्षापासून रखडलेला पुनर्विकास, मुंबईतील कोळीवाडयांचे सीमांकन न झाल्यामुळे त्या परिसराच्या विकासासाठी योजना आखण्याची आवश्यकता, मुंबईतील ॲनी बेझंट रोडवरील अटारिया मॉल येथे वाढत्या दहशतीमुळे त्या ठिकाणी तातडीने भुयारी मार्ग तयार करण्याची स्थानिक लोकप्रतिनिधींची मागणी, भांडूप (प) व इतर भागात डोंगर, टेकडयांच्या पायथ्याशी असलेल्या झोपडयांवर दरवर्षी पावसाळयात दरडी कोसळून होणारे अपघात व त्यांचेसाठी एसआरए योजना राबविण्याची आवश्यकता, माहे फेब्रुवारी, २०१८ च्या दरम्यान मुंबई शहरात अनेक ठिकाणी लागलेल्या आगींची चौकशी करण्याची आवश्यकता, सुभाषनगर चेंबूर येथे म्हाडा

वसहतीमध्ये विकासकांनी मागील १०-१५ वर्षापासून रहिवाश्यांसोबत करारनामे करुनही अद्यापी पुनर्विकास न करता रहिवाश्यांची केलेली फसवणूक, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(शुक्रवार, दिनांक ९ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव)

आठ : **सर्वश्री. अजित पवार, राधाकृष्ण विखे-पाटील, जयंत पाटील, पृथ्वीराज चव्हाण, दिलीप वळसे-पाटील, शशिकांत शिंदे, विजय वडेट्टीवार, गणपतराव देशमुख, जितेंद्र आव्हाड, बाळासाहेब थोरात, जयदत्त क्षीरसागर, अब्दुल सत्तार, भास्कर जाधव, प्रा. विरेंद्र जगताप, सर्वश्री. हसन मुश्रीफ, सुनिल केदार, संदिप नाईक, गोपालदास अग्रवाल, डॉ. सतिश पाटील, सर्वश्री. मो. आरीफ नसीम खान, राजेश टोपे, अमित देशमुख, दिलीप सोपल, ॲड यशोमती ठाकूर, सर्वश्री. राणाजगजितसिंह पाटील, डि एस. अहिरे, बबनराव शिंदे, मधुकरराव चव्हाण, राहुल मोटे, डी. पी. सावंत, मकरंद जाधव-पाटील, कालिदास कोळंबकर, सुरेश लाड, बसवराज पाटील, शिवेंद्रसिंह भोसले, वसंतराव चव्हाण, दत्तात्रय भरणे, अमिन पटेल, बाळासाहेब पाटील, ॲड के.सी. पाडवी, सर्वश्री कुणाल पाटील, संग्राम जगताप, काशीराम पावरा, श्रीमती दिपिका चव्हाण, सर्वश्री. हर्षवर्धन सपकाळ, हनुमंत डोळस, राहुल बोंद्रे, अवधुत तटकरे, नितेश राणे, विजय भांबळे, वैभव पिचड, अमर काळे, पांडुरंग बरोरा, अमित झनक, दिपक चव्हाण, रणजित कांबळे, सर्वश्रीमती सुमन पाटील, अमिता चव्हाण, श्री प्रदिप जाधव-नाईक, डॉ. संतोष टारफे, श्री. शेख आसिफ शेख रशीद, श्रीमती निर्मला गावित, श्री अस्लम शेख, प्रा. वर्षा गायकवाड, सर्वश्री संग्राम थोपटे, भाऊसाहेब कांबळे, त्र्यंबक भिसे, कु. प्रणिती शिंदे, सर्वश्री सिध्दाराम म्हेत्रे, भारत भालके, जयकुमार गोरे, राहुल जगताप, पंकज भुजबळ, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव : (मंत्र्यांचे उत्तर)**

"राज्यात मराठी माध्यमाच्या १३४६ शाळा पटसंख्येचे कारण देऊन बंद करण्याचा शासनाने घेतलेला निर्णय, राज्यातील शाळाबाह्य मुलांचे दोन वेळा सर्वेक्षण करुन देखील किती मुले शाळाबाह्य आहेत याचा निश्चित आकडा शासनाला अद्यापपर्यंत न मिळणे, मुंबई महापालिकेने बंद असलेल्या ३५ शाळांचे खाजगीकरण करणे, सर्व शिक्षा अभियान कार्यक्रम अपयशी ठरणे, पूर्व प्राथमिक प्रवेशाच्या तसेच आरटीई प्रवेशाच्या ऑनलाईन प्रक्रियेसाठी खाजगी इंग्रजी माध्यमाच्या शाळांकडून भरमसाठ प्रवेशशुल्क आकारणी करणे, त्याकडे शासनाचे होत असलेले दुर्लक्ष, विद्यार्थ्यांच्या पाठीवरील पुस्तकांचे ओझे कमी करण्याबाबत ठाम निर्णय न घेणे, राज्य शासनाने दिनांक ३० नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे जाहीर केलेली प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र योजना ही केवळ घोषणाच राहणे, राज्यात जिल्हा परिषदेकडील प्राथमिक शाळांना पुरेशा वर्ग खोल्या नसणे, एका खोलीत दोन वर्ग भरविण्यात येणे, शासनाने कायम विनाअनुदानित शाळांचा कायम हा शब्द काढण्याचे धोरण मान्य केले

असताना अनेक शाळांची २-३ वेळा तपासणी करुन देखील विनाअनुदानित शाळांना अद्याप अनुदान सुरु न करणे, सैनिकी शाळा, के.जी.बी.व्ही (कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय) आदर्श शाळा योजना यांसारख्या पूर्वी सुरु असलेल्या उपक्रमांत असलेल्या अडचणी व प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी शासन दरबारी अनेक वेळा प्रयत्न होऊन देखील त्यात काहीच सुधारणा न होणे, उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील EBC/OBC/SC/ST/SBC या प्रवर्गातील जवळपास १७ लाख विद्यार्थ्यांची उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडील शैक्षणिक फी व इतर अनुदानाची असलेली प्रचंड थकबाकी, त्यामुळे वैद्यकीय, औषध निर्माण, व्यवस्थापन, अभियांत्रिकी महाविद्यालये आर्थिक अडचणीत सापडलेली असणे, शालेय, माध्यमिक व विद्यापीठीय शिक्षणाचा घसरत चाललेला दर्जा, राज्यात सुशिक्षित बेरोजगार तरुणांची वाढत चाललेली संख्या, सुशिक्षित बेरोजगार तरुणांना नोकऱ्यांचे आमिष दाखवून मॅग्नेटिक महाराष्ट्र, मेक इन महाराष्ट्र, स्टार्ट अप महाराष्ट्र आदी फसव्या घोषणा करुन सुशिक्षित बेरोजगार तरुणांच्या समोर नोकऱ्यांचे मृगजळ दाखविण्याचा केलेला प्रयत्न, राज्य शासनाच्या अनेक कार्यालयांमध्ये अ ते ड श्रेणीतील पदे रिक्त असूनही त्यावर नविन उमेदवारांच्या नियुक्त्या न करणे, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परिक्षा उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांना नियुक्तीपत्र न देणे, तसेच नोकरभरतीवर घातलेल्या बंदीमुळे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या परिक्षार्थींमध्ये पसरलेला असंतोष व त्यांनी काढलेले मोर्चे, विदर्भ व मराठवाडयात छोटे मोठे उद्योग व्यवसाय सुरु करुन बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करुन देण्याची संधी असतानाही शासनाचे त्यादृष्टीने नियोजन नसणे, देश पातळीवरील केंद्रिय लोकसेवा आयोगाच्या परिक्षांमध्ये मराठी टक्का वाढविण्यासाठी परीक्षार्थींना आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात शासनाकडून होत असलेली चालढकल, मुंबई विद्यापीठांच्या विविध परिक्षांच्या निकालाचे पुर्नमुल्यांकनाचे रेंगाळलेले काम, कनिष्ठ महाविद्यालयीन अधिव्याख्यात्यांच्या दिर्घकालीन प्रलंबित असलेल्या मागण्या, इयत्ता १० वी व १२ वी च्या परिक्षांचे प्रश्नपत्रिका फुटण्याचे घडत असलेले प्रकार, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने शासनाला येत असलेले अपयश, राज्य सरकारच्या तसेच केंद्र सरकारच्या विविध कार्यालयामध्ये मराठी भाषेचा कार्यालयीन वापरात उपयोग करण्यासंदर्भात परिपत्रके काढण्याशिवाय ठोस उपाययोजना न करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

नऊ : **ॲड राज पुरोहित, श्री शंभुराज देसाई, ॲड. पराग अळवणी, श्री. ज्ञानराज चौगुले, श्रीमती मनिषा चौधरी, डॉ. जयप्रकाश मुंदडा, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. सुभाष साबणे, डॉ. भारती लव्हेकर, सर्वश्री. अनिल कदम, पास्कल धनारे, किशोर पाटील, सजंय केळकर, राजाभाऊ वाजे, उन्मेश पाटील, वैभव नाईक, डी. मल्लिकार्जून रेड्डी, अनिल बाबर, डॉ. राहुल आहेर, चंद्रकांत सोनावणे, महेश चौघुले, राजन साळवी, प्रा. मेधा कुलकर्णी, सर्वश्री. सुनिल प्रभु, बाबुराव पाचर्णे, उदय सामंत, राजेंद्र पाटणी, चंद्रदीप नरके, ॲड. आकाश फुंडकर, सर्वश्री भरतशेठ गोगावले, समीर कुणावार, मनोहर भोईर, विकास कुंभारे, अजय चौधरी, डॉ. देवराव होळी, सर्वश्री. सुनिल शिंदे, राजू**

तोडसाम, मंगेश कुडाळकर, श्रीमती देवयानी फरांदे, सर्वश्री सुभाष भोईर, किसन कथोरे, प्रकाश आबिटकर, सुरेश भोळे, प्रकाश फातर्पेकर, प्रशांत बंब, उल्हास पाटील, नरेंद्र पवार, नारायण पाटील, बाळासाहेब मुरकुटे, अशोक पाटील, सुधाकर भालेराव, हेमंत पाटील, अमित साटम, शांताराम मोरे, वि.स.स यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-

"राज्यात मुंबई, कोकण भागात लाभलेला लांब व निसर्गरम्य समुद्र किनारा, समुद्राच्या सानिध्यातील रॉक गार्डन, समुद्राखालील प्रवाळे व जीवसृष्टीचा आनंद लुटण्यासाठी असलेले स्कूबा ड्रायव्हिंग व स्नार्कलिंग, छत्रपती श्री शिवाजी महाराजांची पवित्र स्मृती व शूर वीरांचा पारंपारिक इतिहास असलेले शिवनेरी, रायगड, सिंधुदुर्ग, तोरणा, मुरूड-जंजीरा, लोहगड, विजयदुर्ग, दुर्गाडी इत्यादी पुरातन व ऐतिहासिक किल्ले व जयगड, सिंहगड, प्रतापगड, माऊली इ. गड यांचे संवर्धन करण्याची आवश्यकता, दर्यासारंग सरखेल श्री. कान्होजी आंग्रे यांच्या पवित्र स्मृती जपण्याची आवश्यकता, औरंगाबादमधील जगप्रसिद्ध अजिंठा व वेरूळ लेणी व गुंफा अत्यंत जुन्या झाल्या असल्याने त्यांचे संवर्धन व पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने तेथे अत्याधुनिक योजना राबविण्याची आवश्यकता, संतभूमी महाराष्ट्रातील पंढरपुरचे विठ्ठल-रखुमाई मंदिर, कोल्हापुरचे महालक्ष्मी मंदिर, तुळजापुरचे भवानीमाता मंदिर, शिर्डीचे साईबाबा मंदिर, अष्टविनायक, शनिशिंगनापूर, भारतातल्या १२ ज्योर्तिलिंगापैकी महाराष्ट्रातील चार ज्योतिर्लिंगे, नाशिकमध्ये होणारा कुंभमेळा, आषाढी एकादशी निमित्त राज्यातून विविध ठिकाणांहून पंढरपूरच्या वारीकरिता पायी निघणारे व दिवसेंदिवस प्रवास करणारे वारकरी यांना वारीच्या मार्गात सुविधा पुरविण्याकरिता नियोजन करण्याची आवश्यकता, विदर्भातील ताडोबा, नवेगाव, बोर व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय अभयारण्य व तेथील राष्ट्रीय प्राणी व समृद्ध वनसंपदा, नागपूरमधील दीक्षाभूमी, देशाची औद्योगिक राजधानी म्हणून ख्याती पावलेले मुंबई शहर, मुंबईतील पुरातन कोळी संस्कृती तसेच फिल्म जगतात बॉलीवूड म्हणून प्रसिद्ध असलेली मुंबईची फिल्म नगरी, मुंबई शहरात असलेले जागतिक व्यापार केंद्र, श्री मुंबादेवी, श्री महालक्ष्मी, श्री सिद्धीविनायक इत्यादी प्रसिद्ध दैवते, देवी माऊंट मेरी, हाजीअलीचा दर्गा, पारशी समाजाची मंदिरे, श्री गोडीजी व श्री शांतीनाथ मंदिर, चैत्यभूमी इत्यादी विविध धर्माच्या भाविकांची श्रद्धास्थाने, तसेच गेट वे ऑफ इंडिया, मरिन ड्राईव्ह, नरिमन पॉइंट, बॅलार्ड पिअर, ससून डॉक, छत्रपती शिवाजी महाराज रेल्वे स्थानक, मुंबई महापालिका इमारत, हुतात्मा चौक, काळाघोडा, छत्रपती शिवाजी महाराज वस्तुसंग्रहालय, विज्ञान भवन, एशियाटिक लायब्ररी, मुंबई विद्यापीठ, हॉर्नीमन सर्कल या ऐतिहासिक वास्तू इत्यादींचे संवर्धन व जतन करण्याची आवश्यकता, दिल्ली बोट क्लब येथून २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनादिवशी निघणा-या परेडच्या धर्तीवर मुंबईतील मरीन ड्राईव्ह ते नरीमन पॉंईट पर्यत प्रतिवर्षी २६ जानेवारी रोजी काढण्यात येणारी भव्यदिव्य व नेत्रसुखद परेड, शैक्षणिक नगरी पुणे शहरातील पुरातन व नावाजलेल्या शिक्षणसंस्था, पश्चिम महाराष्ट्रातील सह्याद्रीच्या नयनरम्य पर्वतरांगा, महाराष्ट्र राज्य पर्यटन क्षेत्रात देशभरातील प्रथम क्रमांकाचे राज्य बनविण्याच्या दृष्टीने व महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा वृध्दींगत करण्याकरिता नियोजनबद्ध व कालबद्ध कार्यक्रम आखण्याची

आवश्यकता ज्यायोगे देशभरातील व जागतिक स्तरावरील पर्यटक महाराष्ट्र राज्यात आकर्षित होऊन राज्यातील हॉटेल्स उद्योग, वाहतूक उद्योग यामध्ये वृद्धी होऊन लाखो बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध होऊ शकेल त्याचप्रमाणे राज्याच्या महसूलात वाढ होईल या दृष्टीने राज्य शासनाचे पर्यटन धोरण बनविण्याची आवश्यकता, कृष्णा खोरे महामंडळातील जलसिंचन प्रकल्प, कालवे व पुनर्वसनाच्या कामांना गती देण्याची आवश्यकता, मत्स्य उत्पादन दिवसेंदिवस कमी होत असल्यामुळे लहान आणि पारंपारिक मच्छिमार करणा-यांवर आर्थिक संकट, कोकणातील व समुद्र किनारपट्टीतील मच्छिमारांना आर्थिकदृष्टया सक्षम करण्याकरिता मत्स्य शेती वाढविण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

दहा : अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-

(मंगळवार, दिनांक १९ डिसेंबर, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली तथापि, पुढे ढकलण्यात आलेली अर्धा तास चर्चेची सूचना) (क्रमांक १)

(१) **श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.**

"पन्हाळा व शाहुवाडी (जि.कोल्हापूर) तालुक्यांतील प्राथमिक शाळांच्या इमारतींच्या दुरुस्तीबाबत" या विषयावरील श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर व इतर, वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९२११९ ला दिनांक ११ ऑगस्ट, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(मंगळवार, दिनांक ६ मार्च, २०१८ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या तथापि, पुढे ढकलण्यात आलेल्या अर्धा तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते ४)

(२) **श्री. मनोहर भोईर, वि.स.स.**

"रायगड जिल्ह्यातील भोम आणि टाकीगाव दरम्यानच्या भागातील बांधबंदिस्ती फुटल्याने भात शेतीचे झालेले नुकसान" या विषयावरील श्री. मनोहर भोईर, वि.स.स यांचा दिनांक २२ डिसेंबर, २०१७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराची यादी क्रमांक ३७५ मधील प्रश्न क्रमांक ७५५९८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(३) **श्री. हर्षवर्धन सपकाळ, वि.स.स.**

"मौजे राजुर (ता.मोताळा, जि.बुलढाणा) येथील रस्त्याच्या रुंदीकरणासह पुलाचे नुतनीकरण करण्याबाबत" या विषयावरील श्री. हर्षवर्धन सपकाळ व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९६०४९ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(४) **श्री. सुनिल प्रभु, वि.स.स.**

"मध्य वैतरणा जलविद्युत प्रकल्पास मंजूरी देण्याबाबत" या विषयावरील ॲड. आशिष शेलार व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९५३५६ ला दिनांक १४ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(५) **श्री. राहुल कुल, वि.स.स.**

"दौंड (जि.पुणे) तालुक्यातील मंजूर क्रीडा संकुलासाठी कृषी विभागाची जागा मिळणेबाबत" या विषयावरील श्री. राहुल कुल व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १००८८७ ला दिनांक १८ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(सोमवार, दिनांक १२ मार्च, २०१८ रोजीच्या बॅलेटद्वारे ठरविण्यात आलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक ६ व ७)

(६) **श्री. संजय सावकारे, वि.स.स.**

"मुंबई महानगरपालिकेच्या भूखंडावर पुनर्विकास आणि इमारत बांधकाम प्रकल्पांकरिता देय असलेले प्रीमियम विकासकांनी थकविल्याबाबत" या विषयावरील श्री. नरेंद्र मेहता व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ९५५६३ ला दिनांक १२ डिसेंबर, २०१७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(७) **श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.**

"हिंजवडी (जि.पुणे) येथे सक्तवसुली संचलनालयाने (ईडी) जप्त केलेल्या भूखंडावर तीन इमारती बांधल्याबाबत" या विषयावरील श्री. भिमराव तापकीर व इतर वि.स.स यांचा तारांकित प्रश्न क्रमांक १०४८८८ ला दिनांक ५ मार्च, २०१८ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १२ मार्च, २०१८

डॉ. अनंत कळसे,
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.